खालील निवेदन केलेल्या स्तोत्र, मंत्र, प्रार्थनांची माहिती धार्मिक पुस्तके व सर्वांसाठी उपलब्ध असलेल्या सार्वजनिक स्त्रोतातून घेतलेली आहे. या मंत्रांच्या सत्यतेबाबत, परिणामकारतेबाबत व अचूकतेबाबत समिती जबाबदार नाही. श्री देवी चामुंडेश्वरी समिती ही या माहितीच्या वापराने कोणास काही त्रास, नुकसान, खर्च, जोखीम, जीवीत हानी वा झीज झाल्यास जबाबदार नाही. वाचकांनी अध्यात्मिक क्षेत्रातील अधिकारी व्यक्तींच्या मार्गदर्शनानुसार व स्वजबाबदारीवर या माहितीचा उपयोग करावा.

The details of the odes, hymns and prayers written below are taken from various religious books, sources and websites available for common citizens and required references have been provided wherever necessary. The samiti will not be responsible and obliged for accuracy, effectiveness, completeness of these odes hymns and prayers. Shri Devi Chamundeshwari Sewa Samiti will not be held liable for any cost, damage, loss of life, distress, mental harm because of use of this information. Such usage may be direct or indirect, with or without belief, or with or without verification. Readers are hereby requested that they may consult appropriate knowledgeable persons in spiritual science or religious traditions/practices prior to relying or acting on such information.

## ।।नवार्ण मंत्र व साधना।।

## ||NAVARNA MANTRA SADHANA||

### ।श्री देवी चामुंडेश्वरी नमः।

### ||Shree Devi Chamundeshwari Namah||

सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके
शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणी नमोस्तुते
उदयोस्तु उदयोस्तु उदयोस्तु

Sarva Mangal Mangalye, Shive Sarvarth Sadhike,
Sharanye Traymbake Gauri, Narayani Namostute

सर्वांचे कल्याण करणारी सर्व मंगला, भक्तांच्या सर्वमनोकामना पूर्ण करणारी, पवित्र असलेली, (त्र्यंबक) शिवशंकराची प्रिय गौरी, आम्ही तुला शरण आलो आहोत. हे नारायणी, आम्ही तुला नमस्कार करतो.

You are holy and brings auspiciousness and completeness to everything graced by you, oh Devi Parvati (Mahagauri), you give refuge to those who surrender before you, Oh Narayani, I bow before you.

क्लींकारी परदेवता भगवतीम् कालीमं कलामालिनीम्।
ऱ्हींकारीं श्रुतिसंयुताम धनमयीं सर्वार्थ संसाधिनीम्।।
ऐं कारीं शुचि सुस्मिताम् गुणमयीं बुध्दिप्रदा मातरम्।
चामुण्डा त्रियुतां सदैवामलां विच्चे तथा भाविनीम्।।

समस्त कला व शक्तिसंपन्न, क्लीं बीजस्वरुपी भगवती महाकालीस, ऱ्हीं बीजमयी वेदांनी वर्णिलेल्या महालक्ष्मीस, जी ऐश्वर्य प्रदान करुन सर्व मनोरथ पूर्ण करते, ऐं बीजस्वरुपी, पवित्र तसेच मंदहास्य करणारी, सर्वगुणविभूषित, बुध्दिप्रदात्री अतिपवित्र भगवती सरस्वतीस, या तीनही बीजस्वरुपांचा जिच्यामधे समन्वय झालेला आहे, अशा भगवती चामुण्डेला माझे भावपूर्ण नमस्कार.

Possessor of all skills and power, Goddess Mahakali, who is represented by word ‘**Klim’**; Goddess Mahalakshmi, which fulfills all desires and bestows wealth, and which is described by holy scriptures (vedas) by word ‘**Hreem**’; Auspicious Goddess Saraswati, who is possessor of all divine qualities and bestows wisdom and intelligence and is represented by word ‘**Aiem**’; and one who is having all these three divinities (devatas) merged within her, and is called **Bhagwati Chamunda,** I bow before you.

कोणताही विपरीत परिणाम न करणाऱ्या नवार्ण मंत्राने केलेली उपासना शीघ्र फल देऊन जीवनाला संपन्नता देते.

One who recites Navarna Mantra gets his/her desires fulfilled and life enriched. The hymns (Mantra) do not cause any negative effect on the devotee.

नवार्ण मंत्राची ९ अक्षरे आहेत व मंत्रजप करण्यासाठी स्फटिकमाला वा रुद्राक्षमाला वापरली जाते. साधारणपणे ९ किंवा २१ दिवसात १.२५ लाख मंत्रजप केला जातो. ज्यांना हे शक्य नसेल ते सकाळी व संध्याकाळी १०८ वेळा मंत्रजप करु शकतात. मंत्र आराधनेची सुरुवात शुक्लपक्ष त्रयोदशीला (पौर्णिमान्त पंधरवड्याचा तेरावा दिवस) करुन त्यानंतर शक्तिनुसार केली जाते. साधनाकाळात पिवळे रेशमी वा सुती धूतवस्त्र नेसून साधकाने उत्तर दिशेला दीप प्रज्वलित करावा, समोर देवीच्या मूर्तीची वा फोटोची स्थापना करावी. मंत्रजपकाळात शाकाहार व ब्रह्मचर्य पाळावे.

The Navarna Mantra has 9 syllables and is recited with rosary of Crystal (rhinestone) beads or Rudraksh (blueberry seeds) beads. Generally, during sadhana it is recited 1.25 lakh times in 9 days or 21 days. Otherwise devote can recite same 108 times in morning and evening respectively as a part of daily rituals. The recital of this Mantra is generally initiated on Trayodashi (thirteenth day of fortnight ending with full moon) and 1.25 lac recitals are done in 9 or 21 days. During the period of recital, the devotee should preferably wear yellow silk or cotton cloth with a sesame oil lamp burning continuously in north direction. The devotee should have idol or photo of Goddess in front of him/her. Traditional precautions like eating of only vegetable food and observing celibacy during sadhana period is expected.

या मंत्रातील नऊ अक्षरांचे अर्थात बीजांचे अर्थ पुढील प्रमाणे आहेत.

The meanings of the 9 syllables (seeds) of this Mantra (hymn) are believed to be as follows.

ऐं ऱ्हीं क्लीं चा मुण्डा यै वि च्चे

Aiem Hreem Klim Cha Mun Da Yei Vi Chhe

ऐं – हे नवार्ण मंत्राचे प्रथम अक्षर असून सरस्वतीबीज आहे. याच्या सिध्दतेने स्मरणशक्ति तीव्र होऊन वाणी प्रभावी होते. हे देवीच्या शैलपुत्री (हिमालयकन्या) या रुपाशी संबंधीत असून सूर्य ग्रहास अनुकूल करते.

Aiem – This is first seed representing Goddess Saraswati. It is believed to cause improvement in speaking ability and memory in a person. It represents the first incarnation of Goddess Parvati i.e. Shailaputri (Daughter of King Himalaya) and facilitates positive energy from Sun.

ऱ्हीं – हे लक्ष्मीबीज असून दरिद्रतेचा नाश करुन वैभवप्राप्ती देते. हे देवीच्या ब्रह्मचारिणी रुपाशी संबंधीत असून चन्द्र ग्रहाला अनुकूल करते.

Hreem – This is seed representing Goddess Mahalakshmi. It is believed to bless devotees with wealth and removes poverty from one’s life. It represents second incarnation of Goddess i.e.

Brahmacharini (One who gives salvation). It facilitates positive energy from Moon.

क्लीं – हे कालीबीज आहे, व शत्रूसंहार आणि षड्रिपुंवर विजय मिळवण्यासाठी याचा उपयोग होतो. या बीजाचा देवीच्या चंद्रघंटा रुपाशी संबंध असून मंगळ ग्रहाला इष्ट करते.

Kleem – This seed represents Goddess Mahakali. It is believed to destroy enemies and worldly obsessions like sexual desires, anger, arrogance, lust, jealousy and greed. It represents third incarnation of Goddess i.e.Chandraghanta and facilitates positive energy from Mars.

चा – हे सौभाग्यबीज असून गृहस्थी जीवन, पतिपत्नीला दीर्घायुष्य व सौभाग्यरक्षणासाठी उपयोगी आहे. याचा कूष्माण्डा या देवीरुपाशी संबंध असून बुध हा ग्रह अनुकूल करते.

Cha – This is seed for luck and fortune. It gives boon for happy and long married life for couples. It represents fourth incarnation of Goddess viz. Kushmanda and facilitates positive energy from Mercury.

मुण – हा आत्ममंत्र असून कुंडलिनी जागरण व ब्रह्म साक्षात्कारासाठी उपयुक्त आहे. हे बीज देवीच्या स्कंदमाता या रुपाशी संबंधीत असून बृहस्पति या ग्रहाला अनुकूल करते.

Mun – This is seed for self-realization and awakening of Kundalini. It represents fifth incarnation of Goddess i.e. Skandmata and brings in positive energy of Jupiter.

डा – हे सन्तान गुरुबीज असून मुलांच्या दीर्घायुष्यासाठी फलदायी आहे. या बीजाचा देवीच्या कात्यायनी रुपाशी संबंध असून शुक्र ग्रहाला अनुकूल करते.

Da – This seed is for reproductive capacity and gives long life to children of devotees. This seed represents Goddess Katyayani and brings positive energy from Venus.

यै – हे भाग्योद्य बीज असून जीवन सफलता प्राप्त करण्यासाठी याचा जप केला जातो. याचा देवीच्या कालरात्रि या रुपाशी संबंध असून शनिग्रहाचा अनिष्ट परिणाम नाहीसा करते.

Yei – This is seed for receipt of favors and success in life. It represents seventh incarnation of Goddess i.e. Kalaratri and contains negative impact of planet Saturn.

वि- या मंत्रबीजामुळे सन्मान व प्रतिष्ठा प्राप्त होते. या बीजाचा देवीच्या महागौरी रुपाशी संबंध असून राहुपीडा नष्ट करते.

Vi – This seed brings recognition and reputation. It represents eighth incarnation of Goddess i.e. Maha Gauri and contains negative impact of Rahu.

च्चे – हे संपूर्ण बीज असून जीवनात परिपूर्णता येण्यास याचा उपयोग होतो. हे बीज देवीच्या सिध्दिदात्री रुपाशी संबंधित आहे व केतू ग्रहाचे दुष्परिणाम नष्ट करते.

Chhe – This seed facilitates completion of purpose of life and is associated with Goddess Siddhidatri which is believed to eliminate negative impact of Ketu.

या सर्व बीजांच्या अध्ययनाने नवार्ण मंत्र बनतो.

All nine syllables put together form Navarna Mantra.

ऐं ऱ्हीं क्लीं चामुण्डायै विच्चे

“Aim Hreem Klim Cha Mun Da Yei Vi Chhe”

जी महासरस्वती, महालक्ष्मी व महाकाली या तीन स्वरुपांचा समन्वय आहे त्या चामुण्डेला आमचे नमस्कार असोत.

We bow before Goddess Chamunda which has divine powers of Goddess Maha Saraswati, Maha Lakshmi and Maha Kali.

या मंत्राच्या सुरुवातीला ॐ (प्रणव) चा उच्चार बंधनकारक नसल्यामुळे आबालवृध्दांना व स्त्रियांना याचा उच्चार करणे सोयीचे जाते.

It is not compulsory to utter Om (Pranav) before beginning of this hymn (Mantra) and hence can be recited by people of all ages, especially women.

## । नवार्ण मंत्र विनियोग।

## **Navarna Mantra Viniyog**

उजव्या हातात पाणी घेऊन खालील मंत्र उच्चारुन पाणी ताम्हणात सोडावे.

The devotee should hold water in right hand and utter following lines and thereafter drop water in copper plate (tamhan) or utensil (used for collection of used water during ritual).

ॐ अस्य श्री नवार्ण मंत्रस्य

ब्रह्मा – विष्णू - रुद्र ऋषय: गायत्र्युष्णि ऽ नुष्टुप छन्दासि,

श्री महाकाली – महालक्ष्मी – महासरस्वती देवता:

ऐं बीजं ऱ्हीं शक्ति: क्लीं कीलकं

श्री महाकाली – महालक्ष्मी – महासरस्वती प्रीत्यर्थं जपे विनियोग:

Om! This Navarna Mantra is composed by Brahma, Vishnu and Rudra (shiva) in Gayatri, Ushnik and Anushtup Chhand (rhythmic sequence of syllables) for seeking blessings of Goddesses viz. Mahakali, Mahalakshmi and Mahasaraswati with Aiem as seed, Hreem as power and Klim as holder of power. The Mantra is recited to get blessing from Mahakali, Mahalakshmi and Mahasaraswati.

## ऋष्यादि न्यासः

## **Rushyadi Nyas**

(न्यास – शरिराच्या विविध भागांना मंत्रोच्चारासहित हस्तस्पर्श करुन चैतन्य प्रदान करण्याची क्रिया)

*Nyas means a process by devotee in the beginning of a religious ritual to touch specific body parts by right hand while uttering holy hymns to bring in cosmic consciousness and energy in such body parts.*

खालील उच्चार करुन शरिराच्या त्या त्या अंगाला उजव्या हाताने स्पर्श करावा.

*After pronouncing the Mantra line, touch the body part indicated with right hand.*

| | |
|---|---|
| ब्रह्मा – विष्णू - रुद्र ऋषिभ्यो नमः | (मस्तकी) |
| गायत्र्युष्णि ऽ नुष्टुपं छन्दोभ्यां नमः | (मुखास) |
| महाकाली – महालक्ष्मी – महासरस्वती देवताभ्यो नमः | (हृदयास) |
| ऐं बीजाय नमः | (गुह्यांगास) |
| ऱ्हीं शक्तये नमः | (पायास) |
| क्लीं कीलकाय नमः | (नाभीस) |

I bow before divine sage viz. Brahma, Vishnu and Rudra (Head)

| | |
|---|---|
| getting blessed by hymns in Gayatri,Ushnik and Anushtup Chhand* | (Face) |
| And I bow before Goddesses Mahakali, Mahalakshmi, Mahasaraswati | (Heart) |
| I bow at 'Aiem', a holy seed (representing Saraswati) | (Rectum) |
| I bow at 'Hreem' a holy seed giving power (representing Mahalakshmi) | (feet) |
| I bow at 'Kleem' a holy seed containing spiritual energy (representing Mahakali) in me (devotee) like rivet holding any item | (Belly button) |

(छन्द हे स्तोत्र वा मंत्रातील ध्वनी अक्षरांची विवक्षित संख्या आहे व ती विशिष्ट रचनेनुसार होते. गायत्री छन्दामधे २४, तर उष्णिक छंदात २८ अक्षरे असतात. त्याचप्रमाणे बृहती छंदात ३६, पंक्तिछंदात ४०, त्रिष्टुभ छंदात ४४ तर अनुष्टुभ छंदात ३२ वा जगती छंदात ४८ अक्षरे असतात.

*(Chhand is a specific metre containing number of syllables in Mantra or Strotam. It is believed that Gayatri Chhand has 24 syllables, Ushnik has 28, Bruhati has 36, Pankti has 40, Trishtubh has 44, Anushtubh has 32 and Jagati has 48 syllables)*

## कर न्यास

## Kar Nyas

कर न्यास ही मंत्रोच्चारादरम्यान अंगठ्याच्या सहाय्याने विशिष्ट बोटांना स्पर्श करण्याची क्रिया

(Kar Nyas is process to touch specific finger by **thumb** while uttering holy syllables of Mantra)

| | |
|---|---|
| ऐं – अंगुष्ठाभ्यां नमः | अंगठा |
| ऱ्हीं- तर्जनीभ्यां नमः | तर्जनी |
| क्लीं – मध्यमाभ्यां नमः | मध्यमा |
| चामुण्डायै – अनामिकाभ्यां नमः | अनामिका |
| विच्चे – कनिष्ठिकांभ्यां नमः | करंगळी |

| | |
|---|---|
| ‘Aiem’ Angushtabhyam Namah | (Thumb) |
| ‘Hreem’ Tarjaneebhyam Namah | (Index finger) |
| ‘Kleem’ Madhyamabhyam Namah | (Middle finger) |
| ‘Chamundayei’ Anamikabhyam Namah | (Ring finger) |
| ‘Vichhe’ Kanishtikabhyam Namah | (Little finger) |

ऐं ऱ्हीं क्लीं चामुण्डायै विच्चे – करतलकर पृष्ठाभ्यां नमः-

दोन्ही हातांची बोटे व पंजा तसेच पृष्ठभागास स्पर्श करणे.

Aiem Hreem Klim Cha Mun Da Yei Vi Chhe Kartalakarprushtabhyam Namah
(Fingers and Palms – of both hands)

## ह्रदयादि न्यासः

## Hridayadi Nyas

| | |
|---|---|
| ऐं – ह्रदयाय नमः | ह्रदय |
| ऱ्हीं – शिरसे स्वाहा | मस्तक |
| क्लीं – शिखायै वषट् | शेंडी |
| चामुण्डायै – कवचाय हुम् | दोन्ही खांद्यास हाताने |
| विच्चे – नेत्र त्रयाय वौषट | दोन्ही डोळे व कपाळास मध्यभागी |
| ऐं ऱ्हीं क्लीं चामुण्डायै विच्चे – अस्त्राय फट् | टाळी |

| | | |
|---|---|---|
| Aiem” | Hridayay Namah | (Heart) |
| ‘Hreem’ | Shirase Swaha | (Head) |
| ‘Kleem’ | Shikhaiye Vashat | (Top knot of hairs) |
| Chamundaiye | Kavachay Hum | (Both shoulders with cross hands) |
| Vicche | Netra Trayay Vaushat | (Both eyes and forehead) |
| Aiem Hreem | Klim ChaMunDa Yei ViChhe | Astray phat (clap) |

## अक्षर न्यास

## Akshar Nyas

(भक्तांनी तर्जनीचा उपयोग न करता शरिराच्या निर्देशिलेल्या भागांना स्पर्श करावा)

**(Devotee to touch the respective organ with hand without using index finger)**

| | |
|---|---|
| ऐं नमः | शिखा (शेंडी) |
| ऱ्हीं नमः | उजवा डोळा |
| क्लीं नमः | डावा डोळा |
| चां नमः | उजवा कान |

| | |
|---|---|
| मुं नमः | डावा कान |
| डां नमः | उजवी नाकपुडी |
| यै नमः | डावी नाकपुडी |
| वि नमः | मुख |
| च्चे नमः | गुह्य |

| | |
|---|---|
| 'Aiem' Namah | Shikha |
| 'Hreem' Namah | Right eye |
| 'Kleem' Namah | Left eye |
| Cha Namah | Right ear |
| Mun Namah | Left ear |
| Da Namah | Right nostril |
| Yei Namah | Left nostril |
| Vi Namah | Face |
| Chhe Namah | Rectum (anus) |

## दिक् न्यास

**Dik Nyas**

साधनाकाळात सर्व दिशानी अनिष्ट शक्तींपासून देवीकृपेने संरक्षण मिळावे म्हणून त्या त्या दिशेला देवी आहे असे कल्पून नमस्कार करणे.

A prayer to Goddess Chamunda to protect devotee from all sides during sadhana or chanting of Mantra. After uttering Mantra, devotee should bow to that direction and bow before goddess.

| | |
|---|---|
| ॐ ऐं प्राच्यै नमः | पूर्व |
| ॐ ऐं आग्नेयै नमः | आग्नेय |
| ॐ ऱ्हीं दक्षिणायै नमः | दक्षिण |
| ॐ ऱ्हीं नैऋत्यै नमः | नैऋत्य |
| ॐ क्लीं प्रतीच्यै नमः | पश्चिम |
| ॐ क्लीं वायव्यै नमः | वायव्य |
| ॐ चामुण्डायै उदीच्यै नमः | उत्तर |
| ॐ चामुण्डायै ऐशान्यै नमः | ईशान्य |
| ॐ ऐं ऱ्हीं क्लीं चामुण्डायै विच्चे उर्ध्वायै नमः | उर्ध्व |
| ॐ ऐं ऱ्हीं क्लीं चामुण्डायै विच्चे भूम्यै नमः | भूमी / अधर |

| | |
|---|---|
| Om Aiem Prachey Namah | East |
| Om Aiem Agnaiye Namah | South East |
| Om Hreem Dakshinaye Namah | South |
| Om Hreem Nairuktaye Namah | South West |
| Om Klim Pratichyei Namah | West |
| Om klim Wayaivye Namah | North West |
| Om Chamundayei Udichyei Namah | North |
| Om Chamundayei Aishanyei Namah | North East |

Om Aiem Hreem Klim Chamundaiye Vichhe Urdhwaiye Namah Up

Om Aiem Hreem Klim Chamundaiye Vichhe Bhumaiye Namah Down

## ध्यानम

## Dhyanam

श्री महाकाली – महालक्ष्मी – महासरस्वती देवतांचे ध्यान करुन मंत्रजपास आरंभ करावा.

The devotee needs to pray Mahakali, Mahalakshmi and Mahasaraswati for blessings and commence chanting of Navarna Mantra.

संदर्भसूची - श्री नारायण दत्त श्रीमाली यांच्या मंत्र तंत्र रहस्य पुस्तिकेतून

Reference - Mantra Tantra Rahasya Booklet by Shri. Narayan Dutt Shrimali